# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक ११/०३/२०१० रोजी सभा सुचना क्र. २१ दि. ०६/०३/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ११) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १२) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १३) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक ११/०३/२०१० रोजी सभा सुचना क्र. २१ दि. ०६/०३/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती. प्रकरण क्र. १४८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये, सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ "अ'' + "क'' + "अंध व अपंग'' + "महिला बालकल्याण'' + "JNNURM'' + "P'' अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे सादर केलेले अंदाजपत्रक पाहता उपलब्ध होणारे उत्पन्न अत्यंत कमी असल्याने केंद्र/राज्य शासनाकडील योजना राबविण्यास निधी उपलब्ध होत नसल्याने मा. आयुक्त साो. यांनी दि. ०२.०२.२०१० रोजी प्रकरण क्र. ११८ अन्वये चे MBMC ACT चे कलम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार उत्पन्नासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीस सादर केलेला होता. त्यावर धोरणात्मक निर्णयासाठी मा. स्थायी समिती ठराव क्र. ९८ दि. ०२.०२.२०१० अन्वये मा. महासभेपुढे मंजूरीस शिफारस केलेली होती. परंतु मा. महापौर यांनी सदर विषय पटलावर घेतला नाही. तद्नंतर दि. ११.०२.२०१० रोजी मा. स्थायी समितीचे ४ सदस्यांनी मा. महापौराकडे सदरच्या विषयाबाबत खास सभा बोलविण्यासाठी पत्र दिले असता तत्कालीन मा. महापौरांनी खास सभा बोलाविली नाही. यास्तव या अंदाजपत्रकात उत्पन्न वाढीचे प्रस्तावास मान्यता देवून नागरिकांवर कराचा कमीत कमी बोजा पडेल हे लक्षात घेवून सन २०१०-२०११ चे मूळ अंदाजपत्रकात उत्पन्नात वाढ करण्यात आलेली आहे. वाढ केलेल्या कराचा तपशिल सोबत जोडलेला आहे. सर्व विभागवार तपशिल, कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल याबाबतची माहिती विचारात घेवून सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात रक्कम रूपये ११.०० लक्ष इतक्या शिलकी अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे.

अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प मंजूरीसाठी सविनय सादर करीत आहोत.

अंदाजपत्रकीय तपशिल खालील प्रमाणे –

| तपशिल | २००९/१० | २०१०/११ |
|---|---|---|
| अंदाजपत्रक 'अ'+'ब'+'क'+ 'वृक्षप्राधिकण' + 'महिला कल्याण' + 'अंध व अपंग'-'JNNURM'अ 'P' एकूण जमा | ५१५६९.८६ | ५८३५५.८७ |
| अंदाजपत्रक 'अ'+'ब'+'क'+ 'वृक्षप्राधिकण' + 'महिला कल्याण' + 'अंध व अपंग'-'JNNURM'अ 'P' एकूण खर्च | ४८६४८.१५ | ५८३४४.८७ |
| अखेरची शिल्लक | २९२१.७१ | ११.०० |

**पाणीपट्टी दरात व इतर शुल्कात अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ केलेली आहे.**

**अ) पाणीपट्टी दरातील वाढ**

| जलजोडणीचा प्रकार | प्रस्तावित दर (रू.) प्रति हजार लिटर | मा. स्थायी समिती सभेने मंजूर केलेले दर (रू.) प्रति हजार लिटर |
|---|---|---|
| घरगुती | २०/- | १०/- |
| वाणिज्य | ८०/- | ४०/- |

**अनधिकृत बांधकामांना दुप्पट दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी.**

**ब) नविन जलजोडणी शुल्कातील वाढ**

| जलजोडणीचा प्रकार | १/२" व्यास | १"व्यास |
|---|---|---|
| **घरगुती** | रू.२०,०००/- | रू.३५,०००/- |
| **वाणिज्य** (बार, रेस्टॉरंट, शॉपिंग मॉल व कॉल सेंटर) | रू.२५,०००/- | रू.५०,०००/- |

**अनधिकृत बांधकामांना दुप्पट जलजोडणी शुल्क आकारण्यात यावे.**

**क) नव्याने लागू करण्यात आलेले कर खालीलप्रमाणे आहेत.**

**पाणीपट्टी लाभ कर – करयोग्य मुल्याच्या ८%**
**मलप्रवाह सुविधा लाभ कर - करयोग्य मुल्याच्या ८%**

सबब उपरोक्त दरवाढ करणेस व नविन कर लागू करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत असून मा. महासभेच्या मंजूरीसाठी शिफारस करीत आहे.

**रस्ता कर, मनपा शिक्षण कर, घरपट्टी कर व करयोग्य मूल्याच्या दरास अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ केलेली आहे.**

| **कराचा तपशिल** | **प्रस्ताव त दर (करयोग्य मूल्याच्या)** | | | **मा. स्थायी समितीने मंजूर केलेले दर (करयोग्य मूल्याच्या)** | |
|---|---|---|---|---|---|
| रस्ता कर | १०% | | | ८% | |
| मनपा शिक्षण कर | ३% | | | २% | |
| मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणे | **करयोग्य मूल्य** | **पूर्वीचे दर** | **प्रस्तावित दर** | **प्रस्तावित दर** | **वाढ** |
| | १ ते १२००० | २८% | ३०% | ३०% | २% |
| | १२००१ ते ३०००० | २८% | ३२% | ३२% | ४% |
| | ३०००१ ते ५०००० | २८% | ३५% | ३५% | ७% |
| | ५०००१ पेक्षा जास्त | २८% | ३८% | ३८% | १०% |
| मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मूल्याचे | **सोबत परिशिष्ट १** | | | **सोबत परिशिष्ट १** | |

| | | |
|---|---|---|
| वाजवी दरास मंजूरी मिळणे बाबत. | | |

सबब उपरोक्त दरवाढ करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत असून मा. महासभेच्या मंजूरीसाठी शिफारस करीत आहे.

**परिशिष्ट १**

**कर आकारणीसाठी वार्षिक भाडेमूल्याचे मा. स्थायी समिती दि. ११/०३/२०१० ने मंजूर केलेले दर**

| अ. क्र. | विभागाचे नांव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फूट प्रती महिना | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जूने दर | | प्रस्तावित केलेले दर | | मंजूर केलेले दर | |
| | | | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मिरारोड (पुर्व) भाईंदर (पुर्व-पश्चिम) | अ- आर सी सी | रु. १.६० | रु. ३.०० | रु. २.०० | रु. ५.०० | रु. २.०० | रु. ५.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.४० | रु. २.५० | रु. १.६० | रु. ४.०० | रु. १.६० | रु. ४.०० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.७० | रु. १.५० | रु. ०.७० | रु. १.५० | रु. ०.७० | रु. १.५० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.४० | -- | रु. ०.४० | -- | रु. ०.४० | -- |
| २ | घोडबंदर काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व महामार्गा लगत | अ- आर सी सी | रु. १.६० | रु. ३.०० | रु. २.०० | रु. ५.०० | रु. २.०० | रु. ५.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.२० | रु. २.०० | रु. १.४० | रु. ३.५० | रु. १.४० | रु. ३.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- |
| ३ | घोडबंदर काशिमिरा, मिरा,महाजन पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व गावठाण | अ- आर सी सी | रु. १.४० | रु. २.८० | रु. १.८० | रु. ४.५० | रु. १.८० | रु. ४.५० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.२० | रु. २.४० | रु. १.४० | रु. ३.५० | रु. १.४० | रु. ३.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.२० | रु. ०.५५ | रु. १.२० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- |
| ४ | उत्तन | अ- आर सी सी | रु. ०.८५ | रु. १.५० | रु. १.५० | रु. ४.०० | रु. १.५० | रु. ४.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ०.६५ | रु. १.२० | रु. ०.८० | रु. २.५० | रु. ०.८० | रु. २.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- |
| ५ | राई मुर्धे, डोंगरी चौकी, मोरवा | अ- आर सी सी | रु. ०.८५ | रु. १.५० | रु. १.५० | रु. ४.०० | रु. १.५० | रु. ४.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ०.६५ | रु. १.२० | रु. ०.८० | रु. २.५० | रु. ०.८० | रु. २.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- |
| ६ | काजूपाडा, चेणे वर्सोवा, माशाचा पाडा, काशी, मिरा-गावठण, महाजनवाडी, घोडबंदर, आदिवासी पाडयामधील आदीवासी कुटुंबे. | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- |
| ७ | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपींग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरिता असलेले) | अ- आर सी सी | -- | रु. ५.०० | -- | रु. ७.०० | -- | रु. ७.०० |
| ८ | हॉटेलसह लॉजिंग | अ- आर सी सी | -- | रु. ५.०० | -- | रु. ७.०० | -- | रु. ७.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बोर्डींग, सार्व. हॉल, मंगल कार्यालये. | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | -- | रु. ४.०० | -- | रु. ५.०० | -- | रु. ५.०० |
| ९ | हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या मोकळया जागा. | | -- | रु. १.०० | -- | रु. २.०० | -- | रु. २.०० |

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वांनुमते मंजूर करण्यात येत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, यह जो प्रकरण है और उसके ठराव बजेट की, मंजुरी हुई। आज शहर मे जो समस्या है आप देख रहे है। महंगाई से लोग परेशान है। तो वह भाव वाढी का है उसको हमारा विरोध है। ऐसी हमारी सुचना लिजाये। जो भी टॅक्स कर मे भाववाढी है। उसमे हमारा विरोध है ऐसी सुचना ली जाये।

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य मदन सिंग जी उसमे आपने जो भाव दरवाढी किया है। उसके अंदर...

**अनिल सावंत :-**

विकास काम का प्रस्तावित किया है। जमा ही नही हुआ तो खर्चा क्या होगा? तो विकास काम को भी विरोध होना चाहिए।

**जुबेर ईनामदार :-**

आपने स्थायी समितीकी बजेट मे चर्चा सत्र मे हिस्सा लिया। और हिस्सा लेते वक्त जितने भी ....

**मदन उदितनारायण सिंह :-**

हिस्सा लिया मतलब क्या काम होनेवाला है। क्या काम नही होनेवाला उसको...

**जुबेर ईनामदार :-**

काम है उतने करने चाहिए। और पैसा कहॉपर बढना चाहिए। उसे भी प्रस्तावित किया।

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मदन जी ठराव सर्वांनुमते मंजुर करो।

**मदन उदितनारायण सिंह :-**

उसमे हमारी सुचना लि जाये।

**प्रविण पाटील :-**

साहेब, प्रत्यक्ष करवाढीला आमचा विरोधी नाही. पण शहरातली आजची जी परिस्थिती आहे. ती करवाढीच्या वातावरणाला योग्य नाही म्हणून आमचा विरोध आहे. आम्ही मान्य करतो. जो गोषवारा आपण दिलेला आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला कमिशनर साहेबांनी आश्वासन दिले आहे. आता जी परिस्थिती उद्‌भवलेली आहे. ती परिस्थिती कायम राहणार नाही. आणि मा. आयुक्त साहेबांनी आपल चॅलेन्ज स्विकारल आहे. की, बजेट च्या अगोदर एवढ मोठा त्यांनी स्वतःहून शब्द दिलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

तशी सुचना लिहा की, शहरामध्ये, परिपूर्ण चांगले शहर की, कचरा मुक्त होईल वगैरे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही कराना. मा. महासभेच्या बजेट मधील. आयुक्तांनी बोलल्याप्रमाणे.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही काय बोलतात.

**मा. आयुक्त :-**

मी बोललो की, १० वी आणि १२ वी च्या मुलांची परिक्षा संपली की, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. तर विद्यार्थी / विद्यार्थीनी परिक्षेला बसणार नाही. त्यांच वैयक्तिक आतोनात नुकसान होईल १८ तारखेपूर्वी केल तर १८ तारखे नंतर एस.आर.पी. मागवून पोलीस बंदोबस्तात पूर्ण ताकदीनिशी प्लॅन्ट सुरू करेल. मा. महासभा बजेट मंजूर करण्यापूर्वी.

**प्रविण पाटील :-**

मा. महासभा बजेट कधी करणार ते आम्हाला माहीत नाही.

**मा. आयुक्त :-**

३१ मार्च पूर्वी बजेट मंजूर करायला पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

आपण बऱ्याच तारखा दिलेल्या आहेत पण काय आहे की, ज्या वेळेला कचरा उचलेल ती तारिख कुठली पण असु द्या. किंवा ज्या समस्या होतील त्यावेळी वाटत की, खरोखर योग्य , शहर.........

**मा. सभापती :-**

म्हणजे तुमच म्हणणं अस आहे ३१ मार्च पूर्वी कचरा प्लॅन्ट सुरू झाला तर करवाढीला तुमची संमती आहे.

**प्रविण पाटील :-**

प्लॅन्ट कधीपण सुरू होवू दे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही अस आता सभापती साहेबांना बोलतात ना.

**प्रविण पाटील :-**

साहेब, मी प्लान्ट बद्दल पण नाही बोलत. शहरामधला कचरा उचला कुठे ही टाका. आम्ही सांगत नाही......

**मा. सभापती :-**

तेवढीच आपली इच्छा आहे ना?

**प्रविण पाटील :-**

शहर हे कर सोसायला आपण सर्वांना मान्य करेल. ही आमची सुचना लिहा.

**अनिल सावंत :-**

कचरा उचलला पाहिजे बरोबर आहे. मुळात ह्या ज्या योजना आल्या जेएनएनयुआरएम च्या ४१० करोड ची योजना. ते सर्व मा. महासभेमध्ये ठराव पास होवून त्यानंतर त्या योजना कार्यान्वित झालेल्या आहे. आणि त्या योजना जर स्टॅन्डींग मधुन मंजूरी दिलेली आहे.

**प्रविण पाटील :-**

आम्ही कुठे ते नाकारतो. आम्ही कर वाढ आणि त्या योजनाचा फार मोठा संबंध आहे. आजची परिस्थिती पण नाकारता येत नाही ना.

**अनिल सावंत :-**

आणि ही जी भाववाढ झालेली आहे. आपण स्टॅन्डींग कमिटी ने बसुन जी भाववाढ केलेली आहे. त्याचा मॅक्झीमम भुजा जो आहे. १ एप्रिल नंतर ज्या सी.सी. दिल्या जाणार आहे. त्यांच्यावरच पडणार आहे. ॲक्जेस्टिंग जे इथले लोकल लोक आहेत त्यांच्यावर तो भार कमी पडणार आहे. परंतु, जेएनएनयुआरएम साठी एम.एम.आर.डी.ए. कडून कर्ज मंजूर करून घ्यायच आहे. केंद्र शासनाकडून, राज्य सरकारकडून ग्रॅन्ड घ्यायची आहे. त्याच्यासाठी ह्या बजेट मध्ये ती भाववाढ प्रस्तावित करून ती इन्कम वाढवून दाखवत गरजेच आहे. म्हणून ही भाववाढ अनिर्वाय असुन सुध्दा ती आपण केलेली आहे.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही एक बाजू बघता. पण दुसरी बाजू बघत नाही.

**अनिल सावंत :-**

दुसरी बाजु आयुक्तांनी सांगितलेले आहे ना. सन्मा. सदस्य याकुब कुरेशी यांनी सुध्दा सांगितलेल आहे.

**याकुब कुरेशी :-**

विषय अभी मंजुर होने वाला है? यह अगर अपून नही करते तो नही होगा।

**प्रविण पाटील :-**

अशी आमची सुचना घ्याना.

**याकुब कुरेशी :-**

आपण ज्याप्रमाणे अट ठेवली. साहेबांनी शब्द दिले की, मा. महासभेच्या अगोदर .....

**प्रविण पाटील :-**

सुचना येवू द्याना.

**अनिल सावंत :-**

प्रोसिडींगमध्ये आल ना.

**मा. आयुक्त :-**

एक वाक्य घाला. सदस्यांनी सुचना मांडली त्या सुचनेसह.

**मा. सभापती :-**

हो सुचनेसह घ्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य प्रविण पाटील यांनी जी सुचना मांडली. मा. महासभेमध्ये ठरावाला मंजूरी होण्याच्या आधी शहरातला कचरा उचलला गेला तर त्यांना दरवाढीचा विरोध नाही.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, अजुन एक विनंती आहे. मी काय बोललो होतो की, हा विषय कशाप्रकारे आला आम्हाला माहित नाही. ज्यावेळेला...

**अनिल सावंत :-**

विकास कामाला पण विरोध आहे का? करवाढ झाली नाही तर विकास काम कशी होणार? कैसा हे १०० रू. का खर्च करनेके लिए आपकी मंजूरी है। लेकिन वह १०० रू. जमा नही होना चाहिए।

**मा. सभापती :-**

कल पहला दिन पास हो गया उसमे सब पार्टी आगई ना। अभी आप को सब दिखता है की, हमलोगो को विकास चाहिए। जेएनएनयुआरएम से आता है। आप कुछ बोलते नही। जभी सब्जेक्ट लिया आप सब ने मंजूरी दिया तब तक सबकुछ होगया। अभी आज मॅडम आप बालो की, हम इसके विरोध मे है। बाकी सब चाहिए तो हमारा खाली विरोध लिखो। इसमे सर्व संमती से होने दे। यह सुविधा सभीको मिलने वाली है।

**अनिल सावंत :-**

कैसा है की, अभी अपून ने एक बाजू देखली। खर्चा १०० रू. होना चाहिए तो १०० रू. जमा भी तो होने चाहिए ना।

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील यांनी जी सुचना केली ती बरोबर आहे.

**सुधा व्यास :-**

मा. सभापती साहब, मेने कल भी यह बात की थी की, सुविधा और योजना मे फर्क है। योजना अच्छी लगती है। लेकिन सुविधा पहले चाहिए ना। अभी जो सिच्वेशन थी ना उसके हिसाब से बोला की, इसका विरोध है। बाकी हमलोग भी सोचते है की, अभी आयुक्त साहब ने बोला की, मिरा भाईंदर अच्छा होना चाहिए वह सब समझते है।

**मा.सभापती :-**

आप जो कमिशनर साहब को बोलते है हमने भी वही बोला। हमारा भी करवाढी सब करते है। लेकिन यह जो समस्या है उसको पहले हल करो। आपका जो विचार है वह हमारा भी है ठराव सर्वानुमते मंजूर फक्त प्रविण पाटील यांनी जी सुचना केली ती त्याच्यात घेण्यात यावी.

**सुधा व्यास :-**

मा. सभापती साहब, मेरी भी सुचना है वह लो ।

**मा. सभापती :-**

पूढचा विषय घेण्यात यावा.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब हा विषय आपण आणलेला आहे. बजेटच्या चर्चे मध्ये. परंतु, हा विषय आणता येतो की नाही आणता येत. तर तुम्ही सांगितल की, आणाच येतो. उद्या मा. महासभेमध्ये १०० टक्के गोंधळ होणार त्यावेळेला मी कालच सांगितल की, आमच्या स्थायी समितीवर ताशेरे ओढले गेलेले आहे. त्यावेळेला तुम्हाला निवेदन करायच आहे. त्यावेळी तुम्ही उठले नव्हते. फक्त सभापती साहेब उठलेले. तेव्हा तुम्हाला काय क्लियरन्स आहे ते तुम्हाला करायला क्लीयर लागतील. उद्या मा. महासभेची अक्कल काढली जाते. स्थायी समितीच पण सगळ काढल जात त्यावेळेला हा विषय आम्ही तर नाही आणला. स्थायी समितीने नाही आणला. हा विषय तुम्ही आणला. तर हा कशाप्रकारे आणला कुठच्या प्रकारे आणला ह्याच्यावर तुम्हाला क्लियरन्स करायच आहे.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समिती सभापती साहेबांनी उत्तर काय द्यायला पाहिजे होते बी.पी.एम.सी.ॲक्ट प्रमाणे महाराष्ट्र मधल्या सर्व महापालिकेचा टेंडर मंजुर करण्याचा अधिकार स्थायी समितीलाच आहे. आतापर्यंत स्थायी समितीने केलेले आहे. पूढे ही स्थायी समितीच करणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

दरवाढ आपण स्थायी समितीने सुचवलेल्या मा. महासभेच्या मान्यतेची गरज पण नव्हती.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आजचा विषय असा आहे की, हा विषय आपण कुठल्या सभेमध्ये आणतो?

**मा. आयुक्त :-**

हे उत्तर त्यांनी द्यायला पाहिजे ना.

**मा. सभापती :-**

ते फक्त टेंडरच नाही बोलले. त्यांनी बोलले की, हा विषय तुम्ही इथे घेतला मग, तुम्ही टोटली त्या बजेटवर चर्चा न करता करवाढ वरती आहे तुम्ही तो ठराव तिकडे कसा मांडला? तर ते त्याच्यामध्ये आहे.

त्याच्यानंतर लॅन्डफिलचा विषय घेतला. तुम्ही तो विषय कसा काय स्टॅण्डींग ला घेतला आणि पास केला. तर त्याच मी त्यांना विवरण करून सांगितल. कमिशनर साहेबांनी काय सांगितल काय नाही सांगितल. कोर्टाचे आदेश काय आहे? त्यावेळेला तुम्हाला मी बोललो होतो लॅन्डफिलच्या बाबतीमध्ये तुम्ही सन्मा. सदस्यांना सांगा. कशामुळे तो विषय घेतला. आणि आम्ही कशामध्ये मंजुर केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

लॅन्डफिलच उत्तर मी दिलेल आहे.

**प्रविण पाटील :-**

लॅन्डफिलच दिल आहे. पण करवाढीच मी सांगतो.

**मा. आयुक्त :-**

करवाढीच्या संदर्भात तुम्ही निर्णयासाठी तिकडे पाठवल त्यांच म्हणन होत तुम्ही निर्णय घेवूनच ते पाठवायला पाहिजे होत.

**प्रविण पाटील :-**

ते नाही. तो विषय झाला. आज जो आपण विषय घेतला तो विषय उद्या मा. महासभेमध्ये येईल.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेमध्ये विषय आला तरी मीच उत्तर देणार आहे.

**प्रविण पाटील :-**

तेच आम्हाला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आणि तुम्हाला पण मी स्ट्रार्ट ला सांगितल. जर स्थायी समितीने बजेटमध्ये इन्क्ल्यूड करून पाठवला आणि मा. महासभेने मंजुरी दिली. आणि अस वाटल की शासनाची मंजुरीची आवश्यकता आहे तर शासनाच्या मंजुरीला पाठवू. जरूरी नाही अस आमच मत आहे. जर वाढीव दराला आम्हाला मान्यता द्या. असा प्रस्ताव पाठवून शासनाची मंजुरी आणु. जर जरूरी लागली तर जरूरत तर लागणार नाही अशी चर्चेमध्ये आहे.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १४८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये, सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ “अ’’ + “क’’ + “अंध व अपंग’’ + “महिला बालकल्याण’’ + “JNNURM’’ + “P’’ अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ११८ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे सादर केलेले अंदाजपत्रक पाहता उपलब्ध होणारे उत्पन्न अत्यंत कमी असल्याने केंद्र/राज्य शासनाकडील योजना राबविण्यास निधी उपलब्ध होत नसल्याने मा. आयुक्त साो. यांनी दि. ०२.०२.२०१० रोजी प्रकरण क्र. ११८ अन्वये चे MBMC ACT चे कलम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार उत्पन्नासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीस सादर केलेला होता. त्यावर धोरणात्मक निर्णयासाठी मा. स्थायी समिती ठराव क्र. ९८ दि. ०२.०२.२०१० अन्वये मा. महासभेपुढे मंजूरीस शिफारस केलेली होती. परंतु मा. महापौर यांनी सदर विषय पटलावर घेतला नाही. तद्नंतर दि. ११.०२.२०१० रोजी मा. स्थायी समितीचे ४ सदस्यांनी मा. महापौराकडे सदरच्या विषयाबाबत खास सभा बोलविण्यासाठी पत्र दिले असता तत्कालीन मा. महापौरांनी खास सभा बोलाविली नाही. यास्तव या अंदाजपत्रकात उत्पन्न वाढीचे प्रस्तावास मान्यता देवून नागरिकांवर कराचा कमीत कमी बोजा पडेल हे लक्षात घेवून सन २०१०-२०११ चे मूळ अंदाजपत्रकात उत्पन्नात वाढ करण्यात आलेली आहे. वाढ केलेल्या कराचा तपशिल सोबत जोडलेला आहे. सर्व विभागवार तपशिल, कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल याबाबतची माहिती विचारात घेवून सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात रक्कम रूपये ११.०० लक्ष इतक्या शिलकी अंदाजपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे.

अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प मंजूरीसाठी सविनय सादर करीत आहोत.

अंदाजपत्रकीय तपशिल खालील प्रमाणे -

| तपशिल | २००९/१० | २०१०/११ |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ‘अ’+‘ब’+‘क’+ ‘वृक्षप्राधिकण’ + ‘महिला कल्याण’ + ‘अंध व अपंग’-‘JNNURM’अ ‘P’ एकूण जमा | ५१५६९.८६ | ५८३५५.८७ |
| अंदाजपत्रक ‘अ’+‘ब’+‘क’+ ‘वृक्षप्राधिकण’ + ‘महिला कल्याण’ + ‘अंध व अपंग’-‘JNNURM’अ ‘P’ एकूण खर्च | ४८६४८.१५ | ५८३४४.८७ |
| अखेरची शिल्लक | २९२१.७१ | ११.०० |

**पाणीपट्टी दरात व इतर शुल्कात अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ केलेली आहे.**

**अ) पाणीपट्टी दरातील वाढ**

| **जलजोडणीचा प्रकार** | **प्रस्तावित दर (रू.) प्रति हजार लिटर** | **मा. स्थायी समिती सभेने मंजूर केलेले दर (रू.) प्रति हजार लिटर** |
|---|---|---|
| घरगुती | २०/- | १०/- |
| वाणिज्य | ८०/- | ४०/- |

**अनधिकृत बांधकामांना दुप्पट दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी.**

**ब) नविन जलजोडणी शुल्कातील वाढ**

| **जलजोडणीचा प्रकार** | **१/२" व्यास** | **१"व्यास** |
|---|---|---|
| **घरगुती** | रू.२०,०००/- | रू.३५,०००/- |
| **वाणिज्य (बार, रेस्टॉरंट, शॉपिंग मॉल व कॉल सेंटर)** | रू.२५,०००/- | रू.५०,०००/- |

**अनधिकृत बांधकामांना दुप्पट जलजोडणी शुल्क आकारण्यात यावे.**

**क) नव्याने लागू करण्यात आलेले कर खालीलप्रमाणे आहेत.**

**पाणीपट्टी लाभ कर – करयोग्य मुल्याच्या ८%**
**मलप्रवाह सुविधा लाभ कर - करयोग्य मुल्याच्या ८%**

सबब उपरोक्त दरवाढ करणेस व नविन कर लागू करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत असून मा. महासभेच्या मंजूरीसाठी शिफारस करीत आहे.

**रस्ता कर, मनपा शिक्षण कर, घरपट्टी कर व करयोग्य मूल्याच्या दरास अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ केलेली आहे.**

<table>
<tr><th>कराचा तपशिल</th><th colspan="3">प्रस्ताव त दर<br>(करयोग्य मूल्याच्या)</th><th colspan="2">मा. स्थायी समितीने मंजूर केलेले दर<br>(करयोग्य मूल्याच्या)</th></tr>
<tr><td>रस्ता कर</td><td colspan="3">१०%</td><td colspan="2">८%</td></tr>
<tr><td>मनपा शिक्षण कर</td><td colspan="3">३%</td><td colspan="2">२%</td></tr>
<tr><td rowspan="5">मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणे</td><td>करयोग्य मूल्य</td><td>पूर्वीचे दर</td><td>प्रस्तावित दर</td><td>प्रस्तावित दर</td><td>वाढ</td></tr>
<tr><td>१ ते १२०००</td><td>२८%</td><td>३०%</td><td>३०%</td><td>२%</td></tr>
<tr><td>१२००१ ते ३००००</td><td>२८%</td><td>३२%</td><td>३२%</td><td>४%</td></tr>
<tr><td>३०००१ ते ५००००</td><td>२८%</td><td>३५%</td><td>३५%</td><td>७%</td></tr>
<tr><td>५०००१ पेक्षा जास्त</td><td>२८%</td><td>३८%</td><td>३८%</td><td>१०%</td></tr>
<tr><td>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ नुसार मालमत्ता कराचे आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मूल्याचे वाजवी दरास मंजूरी मिळणे बाबत.</td><td colspan="3">सोबत परिशिष्ट १</td><td colspan="2">सोबत परिशिष्ट १</td></tr>
</table>

सबब उपरोक्त दरवाढ करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत असून मा. महासभेच्या मंजूरीसाठी शिफारस करीत आहे.

## परिशिष्ट १

### कर आकारणीसाठी वार्षिक भाडेमूल्याचे मा. स्थायी समिती दि. ११/०३/२०१० ने मंजूर केलेले दर

| अ. क्र. | विभागाचे नांव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फूट प्रती महिना | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जूने दर | | प्रस्तावित केलेले दर | | मंजूर केलेले दर | |
| | | | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी | रहिवास वापरासाठी | बिगर रहिवासी वापरासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मिरारोड (पुर्व) भाईंदर (पुर्व-पश्चिम) | अ- आर सी सी | रु. १.६० | रु. ३.०० | रु. २.०० | रु. ५.०० | रु. २.०० | रु. ५.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.४० | रु. २.५० | रु. १.६० | रु. ४.०० | रु. १.६० | रु. ४.०० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.७० | रु. १.५० | रु. ०.७० | रु. १.५० | रु. ०.७० | रु. १.५० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.४० | -- | रु. ०.४० | -- | रु. ०.४० | -- |
| २ | घोडबंदर काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व महामार्गा लगत | अ- आर सी सी | रु. १.६० | रु. ३.०० | रु. २.०० | रु. ५.०० | रु. २.०० | रु. ५.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.२० | रु. २.०० | रु. १.४० | रु. ३.५० | रु. १.४० | रु. ३.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- |
| ३ | घोडबंदर काशिमिरा, मिरा,महाजन पेणकरपाडा, चेणे वर्सोवा सर्व गावठाण | अ- आर सी सी | रु. १.४० | रु. २.८० | रु. १.८० | रु. ४.५० | रु. १.८० | रु. ४.५० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. १.२० | रु. २.४० | रु. १.४० | रु. ३.५० | रु. १.४० | रु. ३.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. १.०० | रु. ०.५५ | रु. १.२० | रु. ०.५५ | रु. १.२० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- | रु. ०.३५ | -- |
| ४ | उत्तन | अ- आर सी सी | रु. ०.८५ | रु. १.५० | रु. १.५० | रु. ४.०० | रु. १.५० | रु. ४.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ०.६५ | रु. १.२० | रु. ०.८० | रु. २.५० | रु. ०.८० | रु. २.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- |
| ५ | राई मुर्धे, डोंगरी चौकी, मोरवा | अ- आर सी सी | रु. ०.८५ | रु. १.५० | रु. १.५० | रु. ४.०० | रु. १.५० | रु. ४.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ०.६५ | रु. १.२० | रु. ०.८० | रु. २.५० | रु. ०.८० | रु. २.५० |
| | | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० | रु. ०.५५ | रु. ०.८० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- | रु. ०.३२ | -- |
| ६ | काजूपाडा, चेणे वर्सोवा, माशाचा पाडा, काशी, मिरा-गावठण, महाजनवाडी, घोडबंदर, आदिवासी पाडयामधील आदीवासी कुटुंबे. | क- माती वीटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- | रु. ०.०५ | -- |
| ७ | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपींग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरिता असलेले) | अ- आर सी सी | -- | रु. ५.०० | -- | रु. ७.०० | -- | रु. ७.०० |
| ८ | हॉटेलसह लॉजिंग बोर्डींग, सार्व. हॉल, मंगल कार्यालये. | अ- आर सी सी | -- | रु. ५.०० | -- | रु. ७.०० | -- | रु. ७.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | -- | रु. ४.०० | -- | रु. ५.०० | -- | रु. ५.०० |
| ९ | हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालय | | -- | रु. १.०० | -- | रु. २.०० | -- | रु. २.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लगतच्या लॉन्स, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या मोकळया जागा. | | | | | | | |

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ "B" अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**प्रविण पाटील :-**

मा. परिवहन सभापती, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २००९-२०१० चे सुधारित व सन २०१०-२०११ च्या मुळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. परिवहन सभापतीचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात रक्कम रू. २.१० लाख इतक्या रकमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २००९/१० | २०१०/११ |
|---|---|---|
| एकूण जमा | १४३३.३३ | २५७१.९० |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | २२५.०० | २३३.३० |
| एकूण खर्च | १६४७.०० | २८०३.१० |
| अखेरची शिल्लक | ११.३३ | २.१० |

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. पुढील प्रकरण घेण्यात यावे.

**प्रकरण क्र. १४९ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ "B" अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ११९ :-**

मा. परिवहन सभापती, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २००९-२०१० चे सुधारित व सन २०१०-२०११ च्या मुळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. परिवहन सभापतीचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात रक्कम रू. २.१० लाख इतक्या रकमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे. अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २००९/१० | २०१०/११ |
|---|---|---|
| एकूण जमा | १४३३.३३ | २५७१.९० |

| | | |
|---|---|---|
| ‘अ’ अंदाजपत्रकातून हस्तांतरण | २२५.०० | २३३.३० |
| एकूण खर्च | १६४७.०० | २८०३.१० |
| अखेरची शिल्लक | ११.३३ | २.१० |

**सुचक :- श्री. प्रविण पाटील** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १५०, वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. अध्यक्ष, वृक्षप्राधिकरण समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २००९-२०१० सुधारित व सन २०१०-२०११ चे मूळ अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २००९/१० | २०१०/११ |
|---|---|---|
| एकूण जमा | १९०.०० | २०४.०० |
| ‘अ’ अंदाजपत्रकातून हस्तांतरण | १३७.०० | १४८.५० |
| एकूण खर्च | ३२६.०० | ३५१.५० |
| शिल्लक | १.०० | १.०० |

**वर्षा भानुशाली :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

एक अभिनंदनाचा ठराव आहे. मिरा भाईंदर महागरपालिका परवाना विभागामार्फत सन २००९-२०१० मध्ये नविन परवाना व नुतनीकरण फी पोटी माहे फेब्रुवारी २०१० अखेर विक्रमी रूपये, १ कोटी ११ हजार रू. इतकी वसुली केलेली आहे. आजपर्यन्त परवाना विभागा मार्फत वसुल करण्यात आलेल्या रकमेमध्ये सदर रक्कम ही उच्चांक आहे. परवाना विभागाचे अधिक्षक श्री. चिंतामण शिंदे हे स्वतः कारखानदाराकडे जावून परवान्याबाबतची कारवाई करत आहे. त्यामुळे सदरची रक्कम महापालिका फंडात जमा झालेली आहे. करिता महापालिकेचे मा. आयुक्त, उपायुक्त, परवाना विभाग, व परवाना अधिक्षक श्री. चिंतामण शिंदे हे अभिनंदनास पात्र असल्याचे त्यांचा अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

याचा माझा अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, सर्व स्थायी समिती सदस्य यांनी महापालिकेच्या विकासासाठी केंद्र शासनाकडे पाणी पुरवठा योजना, अंडर ग्राऊंड ड्रेनेज, घनकचरा, नाली आणि डी.पी. रोड हे प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेले आहे. त्या योजनेचा विचार करून मंजूर झालेल्या योजना आणि मंजुरीसाठी पाठवलेल्या योजना यासर्व गोष्टीचा विचार करून महापालिकेने शासना बरोबर केलेला करार या करारामधील अटी की, करवाढ केल्याशिवाय पुढच्या योजना मंजुर होणार नाही. आणि मंजूर झालेल्या योजना सुध्दा करवाढीच्या आटीवर मंजूर केलेल्या आहेत. हे करारनामा महापालिकेने शासनाबरोबर केलेला आहे. याचा विचार करून आणि विकासाच चित्र डोळ्यापुढे ठेवून सर्व सभापती आणि सर्व सदस्यांनी करवाढ दिला आणि नागरिकांना

चांगल्या प्रकारे सुविधा देण्याचा जो प्रयत्न केला. त्याबद्दल मा. सभापती आणि सर्व सदस्यांच मी अभिनंदन करतो आणि आभार व्यक्त करतो.

**मा. सभापती :-**

मा. स्थायी समितीचे सर्व सदस्य मा. आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब, सचिव साहेब आणि आपल्या महानगरपालिकेचे सर्व अधिकारी वर्ग मिरा भाईंदर महानगरपालिकेच २०१० आणि २०११ च्या मुळ बजेटवर चर्चा करण्यासाठी आपण ८ ते ११ तारखेपर्यंत मॅरेथॉन बैठक या ठिकाणी आयोजित केली. आणि ह्या चार दिवसाच्या अंतरामध्ये आपण सर्व सदस्यांनी ह्या बजेटवर चांगल्याप्रकारची चर्चा करून ह्या शहराच्या विकासासाठी आपण सर्वांनी मेहनत घेवून या बजेटवर सर्व विषयावर चर्चा केली. सदस्यांना चर्चेमध्ये भाग घेताना महानगरपालिकेच्या सर्व अधिकाऱ्यांनी सर्वांनीच अतिशय चांगल्या प्रकारे आम्हाला सहाकार्य केल. मी सर्व सदस्य मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब, आणि सर्व पदाधिकाऱ्यांच मनापासून आभार मानतो. आणि या शहराच्या विकासाठी आज जे आम्ही बजेट मंजूर केलेल आहे. जे बजेट शहराच्या दृष्टीकोनात अतिशय सुंदर आम्ही बनवलेल आहे. अशाप्रकारची मला स्वतःला खात्री वाटते. आपण सर्वांनी चांगल्या प्रकारचे मुद्दे केले. सुधारणा केल्या. आणि हे बजेट २०१०-११ च या ठिकाणी आम्ही मंजुरी दिलेली आहे. सर्वांनी सहकार्य केल. सर्वांनी सर्व ठराव सर्वांच्या मताने आज जो आपला बजेटवर मंजूर झाला. त्याबद्दल पुन्हा एकदा मी आपल्या सर्वांचे आभार मानतो. आपल्या सर्वांना मी धन्यवाद देतो. दुसरी गोष्ट सेन्ट्रल गर्व्हरमेन्टमध्ये १७ वर्षानंतर महिला आरक्षण बिल मंजूर केल. आणि त्या मंजुरीसाठी मला वाटत. शिवसेना, बी.जी.पी. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सर्व पक्ष एकत्र येवून कॉंग्रेस, राष्ट्रवादी ह्या सर्व महत्वाचे पक्ष एकत्र आले. आणि महिला दिना निमित्त या वर्षामध्ये सर्व पक्षाने, सर्व नेत्याने एक ऐतिहासिक निर्णय घेतला. आणि ३३ टक्के आरक्षण ह्या देशामध्ये लागु झाल. मला वाटत या देशामध्ये अशी पहिली घटना आहे. की, एवढ्या मोठ्या प्रमाणात महिलांना ह्या आरक्षणामध्ये सहभागी करून घेतल त्या सर्व पक्षाच आणि सेन्ट्रल गर्व्हरमेन्टच मी मनापासून आपल्या सर्वांच्या वतीने अभिनंदन करतो. आणि ह्याचा लाभ या शहरातील देशातील सर्व महिलांना निश्चितपणे मिळेल. आणि ज्यावेळी ह्या महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळालेल आहे. त्यामुळे या देशाची उन्नती ही निश्चितपणे १०० टक्के होणार आणि हा देश या आरक्षणामुळे या जगामध्ये निश्चितपणे अतिशय चांगल्या प्रकारच होत असेल आणि महासत्ता बनेल यामध्ये शंका वाटत नाही. पुन्हा एकदा सेन्ट्रल गर्व्हमेन्टच आभार मानतो. “ जय हिंद जय महाराष्ट्र” धन्यवाद.

**प्रकरण क्र. १५० :-**

वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत

**ठराव क्र. १२० :-**

मा. अध्यक्ष, वृक्षप्राधिकरण समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात लेखाशीर्षनिहाय वाढ/घट करुन सन २००९-२०१० सुधारित व सन २०१०-२०११ चे मूळ अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | २००९/१० | २०१०/११ |
|---|---|---|
| एकूण जमा | १९०.०० | २०४.०० |
| ‘अ’ अंदाजपत्रकातून हस्तांतरण | १३७.०० | १४८.५० |
| एकूण खर्च | ३२६.०० | ३५१.५० |
| शिल्लक | १.०० | १.०० |

**सुचक :- श्री. चंद्रकांत मोदी** **अनुमोदक :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परवाना विभागा मार्फत सन २००९-१० मध्ये नविन परवाना व नुतनीकरण फी पोटी माहे फेब्रुवारी २०१० अखेर विक्रमी रूपये १,११,००,०००/- इतकी वसुली केलेली आहे. आजपर्यंत परवाना विभागा मार्फत वसुल करण्यात आलेल्या रक्कमेमध्ये सदर रक्कम ही उच्चांक आहे.

परवाना विभागाचे अधिक्षक श्री. चिंतामण शिंदे हे स्वतः कारखानदारांकडे जाउन परवान्या बाबतची कार्यवाही करत आहेत. त्यामुळेच सदरची रक्कम महानगरपालिका फंडात जमा झालेली आहे. करिता महानगरपालिकेचे मा. आयुक्त, उपायुक्त (परवाना विभाग) व परवाना अधिक्षक श्री. चिंतामण शिंदे हे अभिनंदनास पात्र असल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर.

**अभिनंदन ठराव क्र. १२१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परवाना विभागा मार्फत सन २००९-१० मध्ये नविन परवाना व नुतनीकरण फी पोटी माहे फेब्रुवारी २०१० अखेर विक्रमी रूपये १,११,००,०००/- इतकी वसुली केलेली आहे. आजपर्यंत परवाना विभागा मार्फत वसुल करण्यात आलेल्या रक्कमेमध्ये सदर रक्कम ही उच्चांक आहे. परवाना विभागाचे अधिक्षक श्री. चिंतामण शिंदे हे स्वतः कारखानदारांकडे जाउन परवान्या बाबतची कार्यवाही करत आहेत. त्यामुळेच सदरची रक्कम महानगरपालिका फंडात जमा झालेली आहे. करिता महानगरपालिकेचे मा. आयुक्त, उपायुक्त (परवाना विभाग) व परवाना अधिक्षक श्री. चिंतामण शिंदे हे अभिनंदनास पात्र असल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**